# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०८/०५/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद**

**नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई**

दिनांक ०७/०५/२०२४ रोजी ०१.४५ वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा. येथील स्टाफ काटोल उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीत भारसिंगी ते लोहारीसावंगा रोडनी एक ट्रॅक्टर संलग्न ट्राली मध्ये अवैद्यरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी स्टाफने नाकाबंदी केली असता एक महिन्द्रा कंपनीचा विना नंबरचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह येताना दिसला त्यास थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून १) विना नंबरचा ट्रॅक्टर किंमती ३००,०००/—रु २) बिना नंबर ची ट्रॉली १,००,०००/—रु. २) एक ब्रास रेती किंमती ४०००/—रू असा एकूण ४,०४,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर ट्रॅक्टर **चालक नामे— मनोज पुनाराम धुर्वे, वय २५ वर्षे, रा. बगदारी त. जुनारदेव. जि. छिंदवाडा म. प्र. ह. मु. राणवाडी अशोक जुगसेनिया यांच्या घरी राणवाडी २) अशोक रतनलालजी जुगसेनिया, वय ४२ वर्ष, रा. राणवाडी त. नरखेड जि. नागपूर** यांचेविरुद्ध ३७९, १०९ भादंवि. १३०/१७७, ३/१८१, ५/१८१, ५०/१७७ मोवाका. ४८(७), ४८(८) महा. जमीन महसुल संहिता १९६६ ३, ४ सार्व. मालमत्ता नुकसान १९८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, ASI चंद्रशेखर घडेकर HC निलेश बर्वे, HC दिनेश आधापुरे, HC प्रमोद तभाने, HC रणजित जाधव, DPC आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

## अवैध्यरीत्या गाई गौवंशाची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक ०६/०५/२०२४ चे २३/०० वाजता दरम्यान पोलीस स्टेशन बेला येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबीरा द्वारे माहीती मिळाली की जनावरांची अवैधरीत्या वाहतुक केली जात आहे. अशा विश्वसनीय माहीती वरुन हीवरा गावाजवळ नाकाबंदी केली असता बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम एच– ४०/सी टी– १२३० तिला थांबवुन चेक केले असता मागच्या डाल्यामध्ये ११ जनावरे अत्यंत क्रुरतेने व निर्दयतेने वागणुक देत कत्तलीकरीता वाहुन नेतांना आढळुन आल्याने त्यात २ पांढऱ्या रंगाची गाय अंदाजे ४००००/– रुपये व ७ पार्ढरे व १ लालसर रंगाचा गोरे अंदाजे किंमती ८००००/–रू. किंमती असे एकण १० जनावरे किंमत १२००००/– रुपये व बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम एच– ४०/सी टी– १२३० अंदाजे किंमती ५०००००/– रुपये असा एकुण ६२००००/– रुपयाच्या गाई गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्यदयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन सदर गुन्हयातील बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम एच– ४०/सी टी –१२३० चा चालक **आरोपी नामे– १) गणेश दमडुजी झाडे वय ४० वर्ष रा. बेसुर ता. भिवापुर जि. नागपुर २) निसार भाइ रा. मोठा ताजबाग नागपुर** दोन्ही इसमांविरुद्ध कलम ११(१)(क)(ज)(च)(छ)(ठ)(ड) महा प्रा.नि अधि सहकलम ५(१)(९) महा प्रा स कायदा सहकलम ५(१) ५(ठ) गोहत्या बंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बेला येथील ठाणेदार अजित कदम व त्यांचा स्टाफ यांनी केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर